**डॉ. दीपक हर्डीकर**
**व्यवस्थापक**

**कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र**
**डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ**
दापोली ४१५ ७१२, जिल्हा रत्नागिरी (महाराष्ट्र), भारत

दूरध्वनी क्र. (कार्यालय) ०२३५८—२८०२३८ Fax : ०२३५८—२८०२३८; E-mail : atickkv@gmail.com

प्रसिद्धीसाठी बातमी

दापोली, ता. २९ : दापोली येथे सुरु असलेल्या आंतर विद्यापीठ क्रीडास्पर्धांमध्ये तिसऱ्या दिवसअखेर झालेल्या स्पर्धांचे निकाल खालील प्रमाणे—

खोखो (पुरुष) गटात अंतिम सामन्यात स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडने प्रथम, मुंबई विद्यापीठ, मुंबईने द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेला तिसऱ्या क्रमांक पटकावला.
खोखो (महिला) क्रीडा स्पर्धेत मुंबई विद्यापीठाने प्रथम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने द्वितीय तर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने तृतीय क्रमांक पटकावला
मैदानी स्पर्धा

८०० मी. धावणे (पुरुष) यामधे मुंबई विद्यापीठ, मुंबईच्या नानू दिपू देवराजन मनिअम्मा याने प्रथम, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या रामदास पाटील याने द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या चैतन्य होलगरे याने तृतीय क्रमांक पटकावला.

४ बाय १०० मीटर्स टप्पा(पुरुष) शर्यतीमध्ये मुंबई विद्यापीठाने प्रथम, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरने द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तृतीय क्रमांक मिळविला.

८०० मी. धावणे (महिला) यामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरच्या सायली वाघमारे हिने प्रथम, मुंबई विद्यापीठ, मुंबईच्या ऐश्वर्या कैलास आशा मिश्रा हिने द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणेच्या दुर्गा देवरे हिने तृतीय क्रमांक पटकावला.

४ बाय १०० मीटर्स टप्पा(महिला) शर्यतीमध्ये मुंबई विद्यापीठाने प्रथम, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरने द्वितीय तर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांवने तृतीय क्रमांक पटकावला.

५००० मी. धावणे (महिला) यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संजीवनी जाधव हिने प्रथम, याच विद्यापीठाच्या प्रियांका चव्हारकर हिने द्वितीय तर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या प्रतिक्षा पाटील हिने तृतीय क्रमांक पटकावला.

भालाफेक (पुरुष) मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादच्या अनिल रोहिदास घुंगसे याने प्रथम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अक्षय घोंगे याने द्वितीय तर सोलापूर विद्यापीठाच्या सय्यद अफताब खुबुद्दीनने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

गोळाफेक (महिला) या प्रकारात सोलापूर विद्यापीठाची ज्योती बनसोडे प्रथम, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची किरण नवगिरे द्वितीय तर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरची नंदीनी पांढरे तिसरी आली.

उंचउडी (महिला) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या शितल संभाजी पिंजारी प्रथम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या स्नेहल चंद्रकांत हार्डे द्वितीय तर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सिद्धी ढगेने तृतीय प्राप्त केले.

बास्केटबॉल (पुरुष) मध्ये झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात मुंबई विद्यापीठाने तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने बाजी मारली.

बास्केटबॉल (महिला) मध्ये झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबई विद्यापीठाने बाजी मारली.

व्हॉलीबॉल (महिला) मध्ये झालेला पहिला उपांत्य सामना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरने जिंकला तर दुसरा उपांत्य सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जिंकला.

व्हॉलीबॉल (पुरुष) मध्ये झालेला पहिला उपांत्य सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तर दुसरा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूरने जिंकला.

कबड्डी (पुरुष) या उपांत्य सामन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादने तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबई विद्यापीठाने बाजी मारली.

कबड्डी (महिला) या उपांत्य सामन्यात मुंबई विद्यापीठाने तर दुसऱ्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने बाजी मारली.

सही/—

(दीपक हर्डीकर)